कब्जा हक्काने प्रकरण

mouje manda-1 प्र.क्र. 118

ग्रामसेवक सहकारी पतसंस्था मर्या मांडा

क्र.महसुल/कक्ष-१/टे-१/एलबीपी/ग्रा.से.प.पे./काबि-९१/२००६
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे,
दिनांक :- 04 JAN 2007

वाचले :-

१. अध्यक्ष ठाणे जिल्हा ग्रामसेवक सहकारी पतसंस्था मर्यादीत, टिटवाळा, ता.जि.ठाणे यांचा दिनांक ९.७.१९९३ रोजीचा अर्ज.
२. शासनाचे महसुल व वनविभागाकडील ज्ञापन क्र. जमिन २७०२/प्र.क्र.३७३/ज-४ दिनांक १०.८.२००५.
३. विभागीय आयुक्त कोकण विभाग नवी मुंबई यांचेकडील पत्र क्र. मशा/ का-२ जमिन-१/सीआर१२६/२००० दिनांक १७.१.२००६.
४. महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४० तसेच महाराष्ट्र जमिन महसुल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ चे नियम २६,३१, ४१ व ५१
५. शासन निर्णय क्र. जमिन१०/२००२/प्र.क्र. ३८७/ज.१ दिनांक २९ मे २००६.
६. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील पत्र क्र. ठाबावि/ रेशा मुल्यांकन मांडा-४६७९ दिनांक १०.७.२००६.

---

## आदेश

ज्याअर्थी मौजे मांडा ता. कल्याण येथील स.नं. १५७/१ पै मधील क्षेत्र ०.०२.४ चौ.मी. जमिन अध्यक्ष ठाणे जिल्हा ग्रामसेवक सहकारी पतसंस्था मर्यादीत, टिटवाळा, ता.जि.ठाणे यांनी या पतसंस्थेस विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी मौजे मांडा ता. कल्याण येथील स.नं. १५७/१ पै मधील ०.०२.४ हे.आर. एवढी जमीन त्यावरील इमारतीसह ठाणे जिल्हा ग्रामसेवकाची सहकारी पतसंस्था मर्यादित टिटवाळा या पतसंस्थेस महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४० तसेच महाराष्ट्र जमिन महसुल (शासकीय जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ च्या नियम २६ मधील तरतुदीनुसार नियमीत अटी व शर्तीवर मंजुर करण्यास शासनाने त्यांचे उपोध्यातील अ.क्र. २ चे ज्ञापनाने मंजुरी दिलेली आहे.

अणि ज्याअर्थि विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांनी त्यांचे उपोध्यातील अ.क्र. ३ चे पत्रान्वये मौजे मांडा ता. कल्याण येथील स.नं. १५७/१ पै मधील क्षेत्र ०.०२.४ चौ.मी. जमिन जिल्हा ग्रामसेवक सहकारी पतसंस्थेस महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४० तसेच महाराष्ट्र जमिन महसुल (शासकीय जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ च्या नियम २६, ३१, ४१ व ५१ मधील अटींचा समावेश करुन मंजुरीचे आदेश निर्गमित करण्याबाबत कळविले आहे.

ज्याअर्थी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी त्यांचेकडील उपोध्यातील अ.क्र. २ चे पत्रान्वये जागेवरील इमारतीच्या मुल्यांकनाची रक्कम रु. ३२,८१५/- रु. (बत्तीस हजार आठशे पंधरा मात्र) इतके असल्याचे कळविले आहे.

ज्याअर्थी उपोध्यातील अ.क्र. ५ चे शासन निर्णय अन्वये शासकीय जमिन कब्जाहक्काने मंजुर करताना मुल्यांकनासाठी शिघ्रसिध्द गणकानुसार लागु करण्याबाबत आदेशीत केले आहे.

ज्याअर्थी दुय्यम निबंधक कल्याण यांचेकडील शिघ्रसिध्द गणकानुसार मौजे मांडे ता. कल्याण येथील जमिनीचे तात्पुरते मुल्यांकन हे रक्कम रु. १४००/- प्रति चौरस मीटर आहे. 4

..२/-

श्री. वसंत दिनकर वझे
विशेष कार्यकारी अधिकारी (S.E.O.)
ठाणे ज. क्रमांक - ४८२/२००७